



संत तुकाविप्र

## मनोगत

सन्तांचे चरित्र हे सागराप्रमाणे असते त्याला शब्दबद्ध करणे माझे पामराचे काम नाही आणि ती माझी योग्यतापण नाही . सन्त तुकाविप्रांबद्दल लिहीण्याचा हेतू , "सन्त तुकाविप्रांच्या अध्यात्मीक साहित्यास जन सामान्यापर्यंत पोहोचवण्याचा संकल्प माझे पूज्य पिताश्री श्री विनायक केशव विप्र ( भानुदासबुवा ) व माझे आदरणीय जेष्ठ बंधू श्री तुकाराम नारायण विप्र यानी केला आहे . त्यांच्या या कार्याला समाजातील घटकांचा हातभार लागण्यासाठी , "संत तुकाविप्र व त्यांचे साहित्य" या विषयीची माहिती प्रसार माध्यमाव्दारे समाजाभिमुख करणे एवढाच आहे .
आजच्या या स्पर्धेच्या जगात मानवाला मनःशान्तीची नितांत गरज आहे ,आणि ती मनःशान्ती फक्त संत साहित्यच देवू शकते . याचा अनुभव प्रत्येक मानवाने घेतलेला असतो . सन्त तुकाविप्रांचे साहित्य हे आम्हाजवळ असलेले समाजाचे देणे आहे व ते स्विकारण्यासाठी समाजातील अभ्यासू व कृतीशील घटकाने पुढाकार घेणे गरजेचे आहे .हा अध्यात्मीक साठा जो सन्त तुकाविप्रांनी मानवजन्माच्या कल्याणासाठी निर्माण केला, आजपर्यंतच्या माझ्या पुर्वजांनी तो जतन केला . आणि हाच अमृत कलश समाजास उपलब्ध व्हावा या सदहेतूने मी सर्व सन्त साहित्याच्या सर्व अभ्यासकाना, प्रकाशकाना, प्रसारमाध्यमांना कळकळीची विनंती करतो की सन्त तुकाविप्रांच्या साहित्यास समाजाभिमुख करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे .

## सन्त तुकाविप्र अवतारमागील इतिहास

सन्त तुकाविप्रांचा अवतार म्हणजे

अवचट नव्हे आलो नेमे जन्मा । कीर्तन महीमा कलीमाजी म्हणोनि ।
आर्व आहे आम्हा शंभर कोटीचे । खर्व या नामाचे संकिर्तन आमुचे ।

याचा प्रत्यय आहे

श्री वाल्मीकींच्या शत कोटी रामायणाने "राम" या द्विअक्षरी मंत्रामध्ये जन्माचे सार्थक करण्याचे सामर्थ्य आहे , असे उदगार पंढरपुर येथील संत सभेमाजी संत ज्ञानेश्र्वर माउलीच्या मुखातून निघाले आणि हे ऐकून सन्त नामदेव महाराज ,माझ्या विठ्ठल नामामध्ये का ही शक्ती नाही या विचाराने खिन्न झाले . त्यांनी विठू माउलीच्या मंदिरात धाव घेतली . विठ्ठलाचे चरण कमल धरुन त्यानी "विठ्ठल" हा मंत्र सिद्ध करण्यासाठी शतकोटी रामायणाप्रमाणेच " शतकोटी विठ्ठलायन" करेन असा संकल्प केला .नामदेव गाथ्यातील हा अभंग त्याची साक्ष देतो

चंद्रभागेतीरी आयकील्या गोष्टी । वाल्मीके शतकोटी ग्रंथ केला ।
तेणे माझ्या चित्ता बहु झाले क्लेश । व्यर्थ म्या आयुष्य गमाविले ।
जावूनी राउळा विठोसी विनविले । वाल्मीकीने केले रामायण ।
असेन मी खरा भक्त तुझा देवा । सिद्धीस हा न्यावा पण माझा ।
शतकोटी तुझे करीन अभंग । म्हणे पांडुरंगा ऐक नाम्या ।
तयेवेळी होती आयुष्याची वृद्धी । आताची अवधी थोडा असे ।
नामा म्हणे जरी न होता पुर्ण । जिव्हा उतरीन तुज पुढे ।

या संकल्पामुळे भगवंत क्षणभर विवंचनेत पडले . ते नामदेवाच्या पाठोपाठ आलेल्या संत ज्ञानोबांस म्हणाले "माझ्या

लाडक्या भक्ताचा संकल्प तर पुर्णत्वास जायला हवा ,आणि कलीयुगातील आयूष्य मर्यादेचे बंधनही पाळावयास हवे . तेव्हा आपणच मार्ग सुचवावा" यावर ज्ञानदेव बोलते झाले, "हे पंढरीच्या राण्या, मायबापा तुझ्या भक्ताचा संकल्प हा त्याच्या तिसऱ्या जन्मात म्हणजे तुकाविप्र अवतारात पूर्ण होईल असे करावे . संत ज्ञानदेवाची वाणी ऐकून विठ्ठलाने तथास्तू म्हटले . म्हणजेच संत नामदेवाचा हा महान संकल्प सन्त तुकाविप्र अवतारात पूर्णत्वास गेला . संत तुकोबारायांचा प्रमाण अभंगही तेच गणित सांगत आहे .

केले अभंग गणित । ते ऐका संत तुम्ही जन ।
साठ लक्ष आणि चौऱ्यानव कोटी । बाकी ती सेवटी राखीयेली
पाच कोटी आणि लक्ष हे चाळीस । शतकोटी ऐसा ग्रंथ झाला ।
अडतीस लक्ष आणि पंचाहत्तर हजार । माप कोटी चार तुका म्हणे ।
एक कोटी सव्वालक्ष त्यात बाकी । कृष्णेच्या तटाकी पुर्ण होय ।
तुकाविप्र ऐसा जन्म विप्र कुळी । संतामाजी बळी आगळा जो
नामदेव सोडी संकल्प जेधवा । ज्ञानदेव तेव्हा म्हणतरे
तृतिय अवतार जगप्रसिद्ध । तुकाविप्र बोध करी जना ।
तुका म्हणे आहो तये कुळी आम्ही । संतराज तुम्ही ऐका हो ।

या संकल्पाच्या संदर्भातला संत तुकाविप्रांचा खालील अभंग देखील याची पुष्टी देत आहे.

चौऱ्याणव कोटी साठ लक्ष । नामदेव पुर्ण ब्रम्ह वदला की ।
पाच कोटी अडतीस लक्ष तुका । पंचाहत्तर ऐका सहस्त्रकी ।
सव्वालक्ष बाकी तेयोनी राहीली । विठ्ठल माउली सिद्धी नेत ।
तुकाविप्र नामदेव शतकोटी । संकल्प सेवटी विठ्ठलाइ ।

संतश्रेष्ठ नामदेवांचे हे तीन अवतार म्हणजे ज्ञान भक्ती व वैराग्य यांचे साक्षात स्वरुपच आहे .
ज्ञानियांच्या राजाचा वरदहस्त लाभलेले सन्त श्री नामदेव हे साक्षात ज्ञानस्वरुप होय . भक्तीसागर सन्त एकनाथांचे समकालीन असलेले श्री सन्त तुकाराम महाराज हे भक्तीस्वरुप होय . सर्व सुखांना त्यागून रामाचे सेवक झालेल्या सन्त रामदासांचे परम चाहते श्री सन्त तुकाविप महाराज हे साक्षात वैराग्यस्वरुप होय.

## सन्त तुकाविप्रांचा जन्म ,विद्याभ्यास व गुरुंची समाधी

" मागू नये काही देवाही दीकांना । उदर पूर्तीला कोणे काळी ।
फिरवावी झोळी करावा आनन्द । देवासी नैवेदय सर्वाभूती ।
गूंतू नये कोठे ईनामा वार्षिका । सकळ भाविका सूचनाही ।
तुकाविप्र एका झोळीच्या आधारे । किर्तन गर्जे सर्व काळ ।"

असा वैराग्याचा सन्देश देणारे सन्त तुकाविप्र हे मुळचे सातारा जिल्हयातील रहिमतपूर गावचे विपट ( कुलकर्णी) होय . त्यांचे पणजोबा , प्रल्हादपंत हे रंगनाथ स्वामी निगडीकरांचे शिष्य होते .तुकाविप्रांचे पिता भगवंतराव विपट हे छत्रपती शाहू महाराजांच्या दरबारात नोकरीस होते. राजकारणातील काही घटनांमुळे त्यांचे मन खिन्न झाले आणि भगवंतरावांनी राजकारणातून तसेच गृहस्थाश्रमातून निवृत्त व्हायचे ठरवले . .पुढील जीवनक्रम व ध्यान धारणेसाठी ते चाफळला गेले . पण तेथील तत्कालीन मठाधिपती श्री लक्ष्मणस्वामी यांनी भगवंतरावाना सन्यास न घेता परत गृहस्थाश्रम स्विकारावा असा आदेश दिला . आणि आशिर्वाद देवून परत स्वगृही पाठवले.
कालांतराने भगवंतरावांच्या पत्नीस गर्भधारणा झाली . गर्भातच बालक तुकारामास त्यांचे मातामह श्री विप्रनाथ स्वामी यानी अजपा गायत्री मंत्राचा उपदेश देवून आपले शिष्यत्व देवू केले . बाळ तुकाराम जन्मले तेच "तुकाविप्र" नाममुद्रा घेवूनच .
सन्त ज्ञानदेव ,सन्त निवृत्तीनाथ ,संत सोपानदेव , सन्त मुक्ताबाई व सन्त तुकाविप्र यांच्या जन्मात साम्य हेच की दोन्हीही ठिकाणी जन्म हा वडीलांच्या सन्यस्त मनोवृत्तीतून परतल्यावरच झालेला आहे .
श्रावण कृष्ण अष्टमी शके १६५० या रोजी सन्त नामदेवानी तुकाविप्र नाममुद्रेने आपला तिसरा व अखेरचा अवतार धारण केला . वयाच्या पाचव्या वर्षी त्यांचे उपनयन झाले . उपनयन संस्कारानंतर त्यांच्या मातेला आपला पुत्र

आपल्यापासून दुर गुरुगृही जातो आहे म्हणुन चिंता व दुःख वाटत होते परंतु ज्या प्रमाणे भगवान श्री कृष्णाने पार्थाला गीता सांगीतली तसेच बालक तुकाविप्रांनी आपल्या मातेला अभंग गीता सांगीतली व तिची चिंता हरण केली . तदनंतर ते अध्यनासाठी गूरुगृही गेले .ॐकार ते चारही वेद या विद्या सन्त तुकाविप्रांनी केवळ २४ महिन्याच्या कालावधीत आत्मसात केल्या . धन्य ते गूरु आणि धन्य ते शिष्य । विप्रनाथस्वामींना आपल्या शिष्याच्या आगाध बुद्धिचे कौतूक होते . त्यानी बाल तुकाविप्रांना समाधियोगाचापण कृतीपाठ दिला.
आपला शिष्य आता सर्व विदयांमधे पारंगत झालेला पाहून विप्रनाथ स्वामींनी ईहलोकीची यात्रा संपविण्याचा निर्णय घेतला . त्यानी फाल्गुन कृष्ण १४ , शनिवार, नळनाम संवत्सर , शके १६५७ ,या शुभ मुहूर्तावर अंजनवती , जी . बीड येथील मठात सतत १४ दिवस कीर्तन केले ,कीर्तनाचा शेवटचा हरीगजर चालला असताना विणा व टाळ अवघ्या सात वर्षाच्या बालक तुकाविप्रांकडे दिले आणि " जय जय विठोबा रखुमाइ " या गजरात योगसामथ्याने आपला देह पंचतत्वात विलीन केला . पुंडलिक वरदा ………नंतर श्रोते भानावर आले पहातात तर वीणा सन्त तुकाविप्रांच्या हातात आणि विप्रनाथ स्वामी कीर्तन करीत होते त्या ठिकाणी फक्त तुळशी व बुक्का शिल्लक होता
सर्वानी मनोमन त्या ईश्वरी साक्षात्काराला नमस्कार केला .

## तुकाविप्रांचा विवाह

सन्त तुकाविप्रांचा विवाह हा देखील पूर्व जन्मीचाच संकेत आहे . सन्त तुकाराम अवतारात असताना ब्रम्हपूरी येथील एका ब्राम्हण कन्येशी, (सगूणेशी ) अध्यात्मावर चर्चा करीत असताना ,सन्त तुकारामांचे अथांग ज्ञान व विठ्ठलावरील अगाध भक्ती पाहुन सगूणेच्या मनात सन्त तुकारामांबद्दल प्रथम आदर, प्रेम व नंतर कामभावना निर्माण झाली . तिने तुकाराम महाराजास आपणाशी विवाह करण्याविषयी विचारले . तुकाराम महाराजांना तीचे झालेले हे अधःपतन सहन झाले नाही . ते म्हणाले

**परावया नारी रखुमाइ समान । हे गेले नेमुन ठाइचेची**
**जायी तू वो माते न करी सायास । आम्ही विष्णूदास तैसे नव्हो ।**
**न सहावे मज तुझे हे पतन । नको हे वचन दुष्ट वदो ।**
**तुका म्हणे तुज पाहीजे भ्रतार । तरी काय नर थोडे झाले ।**

तुला विवाहच करावयाचा असेल तर जगात इतर पुरुष बरेच आहेत .तू मला तुझ्या मोहपाशात गुंतवण्याचा प्रयत्नही करु नकोस . संत तुकाराम महाराजांचे वचन ऐकून सगुणेला पश्चाताप झाला . तिने आपल्या या अपराधाला काय प्रायश्चित आहे असे विचारले . संत तुकाराम महाराजांनी तिला या अपराधाला देहदंडाचे प्रायश्चित सुनावले पश्चातापदग्ध झालेल्या सगुणेनी संत तुकाराम महाराजांस विनंती केली, "ज्या कामाने माझे अधःपतन केले तो काम आपण माझ्यातून कायमस्वरुपात घालवावा व मला निष्काम करावे .तिला झालेला पश्चाताप पाहुन संत तुकाराम महाराजांचा राग शमला व ते सगुणेस म्हणाले . या जन्मी आपण देहदंडाचे प्रायश्चित घ्यावे आपली निष्काम होण्याची इच्छा आम्ही आपल्या व आमच्या पुढील जन्मात पूर्ण करु .
शके १६५८ साली वयाच्या आठव्या वर्षी सन्त तुकाविप्रांचा सगूणेशी विवाह झाला . सगूणेला निष्काम करण्याचे असल्याने त्यानी जन्मभर "असिधारा" व्रताचे पालन केले . असिधारा व्रत म्हणजे पत्नीशी समागम न करता रहाणे . तुकाविप्रांच्या विवाहानंतर दोन वर्षातच त्यांना मातृछत्रास अंतरावे लागले . आषाढ कृष्ण द्वादशीला त्यांच्या मातेने पंढरपूर येथे श्री विठ्ठल चरणी आपला देह विसर्जीत केला . तुकाविप्रांनी आपल्या आईचे उत्तर कार्य नीरा नरसींगपुर येथे केले व काही दिवस तेथे वास्तव्य करुन गांधर्ववेदाचे अध्ययन केले. शके १६६० ते शके १६६६ या काळात सन्त तुकाविप्रांनी तिर्थाटन केले.

## संकल्प पूर्तिचा संदेश

सन्त तुकाविप्र दर वर्षी आषाढ व कार्तीक एकादशीला दिंडी घेवून पंढरपूरला जात असत . विठूमाउलीचे दर्शन घेउन सायंसमयी ते बरोबर आलेल्या वारकऱ्यांसोबत चंद्रभागेच्या वाळवंटात कीर्तन करीत असत . प्रतिवर्षी प्रमाणे शके १९६६ ला कार्तीक एकादशीसाठी ते किर्तनासाठी वाळवंटी आले असता पहातात तो चंद्रभागेचे पात्र भरुन वाहत होते . वाळवंटात जी काही थोडी जागा होती ती इतर संत मंडळींनी व वारकऱ्यांनी व्यापली होती . त्यांना कीर्तन करण्याकरीता तेथे जागाच शिल्लक नव्हती ते भक्त पुंडलीकाच्या देवळात गेले ,प्रथम त्याच्या माता पित्याचे दर्शन घेऊन त्यांनी ज्याच्यासाठी युगानयूगे भगवंत कटेवर हात देऊन उभे आहेत अशा न भुतो न भविष्यती असणाऱ्या महान भक्त पुंडलीकाला नमस्कार केला . त्यानी भक्त पूंडलीकाला आपली समस्या सांगीतली. आणि आश्चर्य म्हणजे भक्त पूंडलीकाने आपले देवालय पूर्वेस सरकवून सन्त तुकाविप्रांच्या किर्तनासाठी जागा करुन दिली . याच रात्री सन्त तुकाविप्रांनी आपल्या योग सामर्थ्याने प्रत्येक किर्तनकारामार्फत एकाच अभंगावर किर्तन करविले.

सकाळ होताच साक्षात विठ्ठलाने सन्त तुकाविप्रांना "दौत लेखणी" देवून संकल्पपूर्तीसाठी कृष्णातीरी जावे अशी आज्ञा केली . विठू माउलीचा आशिर्वाद घेवून सन्त तुकाविप्र कृष्णेकडे येत असता वाटेत निगडी येथे आले . तेथे रंगनाथ स्वामींचा निगडीकरांचा पुण्यतिथी महोत्सव चालू होता .

संत तुकाविप्रांचे पणजोबा हे याच रंगनाथ स्वामींचे शिष्य होते . महोत्सवानिमीत्ताने संस्थानचे तत्कालीन महाराज म्हणजे थोर संतकवी श्री श्रीधरस्वामी यांचे पुत्र श्री मनोहरस्वामी यांनी संत तुकाविप्रांना रात्री समाधी समोर कीर्तन सेवा करण्याची विनंती केली . रात्री तुकाविप्रांनी रंगनाथ स्वामींच्या समाधीसमोर कीर्तन केले . कीर्तनाच्या प्रारंभी त्यांनी रंगनाथ स्वामींना भाव पुष्प वाहीले

नमीयली निजरंग माउली l समाधी या नीगडी ll धृ ll
केला सर्वस्वाचा निजभावे उद्धार , सर्वस्व झाले अवतार l
नरदेह सर्वोत्तम हे सर्व कृष्ण वेण्या थडी ll१ll
भक्तीभावाने विचरोनी ,संकीर्तन रंगणी l
प्रेमे नाचतसे निजधानी , सवार्थ करोनी केला देव गडी ll२ll
मार्गशिर या विभुती मासात हे तीथी l
कृष्ण दशमी पुण्यतीथी , सतकीर्ती उभवली देह गुढी ll३ll
तुकाविप्र या सत्संगी , कीर्तन प्रेम रंगी l
नाचत उभा या कलीयुगी , नमूनी संत योगी धन्य होय गडी ll४ll

अध्यात्माचे अगाध ज्ञान ,वाणीवरील प्रभूत्व व ईश्वर चरणी असणारी गाढ भक्ती या द्वारे संत तुकाविप्रांनी श्रोत्यांना साक्षात रंगनाथस्वामींचेच दर्शन करविले .

रंगनाथ स्वामींचा आशिर्वाद घेवून सन्त तुकाविप्र कृष्णातीरी ब्रम्हपूरी ( जि सातारा ) येथे येवून पोहोचले. कृष्णेचे ते शांत पात्र पाहताच त्यांना त्यांच्या मातोश्रींची आठवण आली . ती जागा आणि परिसर त्यांना खुप भावला . त्यांनी तपासाठी हीच जागा निश्चीत केली . दुसरे दिवशी तेथील डोहात स्नानास गेले असता त्यांच्या हाती विठ्ठल रखूमाई च्या मूर्ती आल्या . याच डोहात सन्त रामदासस्वामींना चाफळ येथे प्रस्थापित केलेल्या रामाच्या मूर्ती सापडल्या होत्या.

## पहिले तप : शके १६६७ ते शके १६७८

सन्त तुकाविप्रांनी विठ्ठल रूख्मिणीच्या मूर्तींची प्रस्थापना ब्रम्हपूरी येथे केली. ब्रम्हपूरी येथेच साक्षात विठू माउलीच्या सानिध्यात त्यांची तपश्चर्या सूरु झाली . त्यांचा दिनक्रम ठराविक होता . प्रातःकाळी उठून स्नान, संध्या देवपुजा आदी आटोपून पाच घरी कोरान्न व कोरडी भिक्षा मागावयाची . वास्तव्याच्या ठिकाणी येऊन झोळीची पूजा करावयाची . झोळीला ते कामधेनू म्हणत असत. आलेल्या शिध्यातून सगूणा मातेने स्वयंपाक करावयाचा , देवासी नैवेदय अर्पण करावयाचा . त्या नैवेदयाचे तीन भाग करावयाचे एक भाग गोमातेला ,दूसरा भाग अतिथीला व शेष भाग पती पत्नीने मिळून सेवन करावयाचा . एकदाच व तोही अल्प आहार हाच त्यांचा यज्ञ होता . उर्वरीत दिवसात अभंग लिखाण तर सांयकाळी शेजारील गावात किंवा ब्रम्हपूरीतच लिहीलेल्या पैकी एका अभंगावर ते कीर्तन करीत असत .

अशाच प्रकारे त्यांचा दिनक्रम चालला असता एका दिवशी त्यांच्या भेटीला श्री विठोबा चातुर्मासे व इतर सन्त मंडळी आली होती . सन्तांच्या परस्पर भेटीचे वर्णन कोणी ते काय करावे कारण सन्तांच्या परस्पर भेटीच्या अनुभूतीमुळे वाणींची देवता सरस्वती ही शब्दांची गुंफण करायचे सोडून त्या अनुभूतीतील अमृत आस्वाद घेण्यात रममाण झाली होती.

परस्पर भेटीचा त्या अवर्णनीय सोहळयाची सांगता होऊन उभयंताची हरी गूण चर्चा सूरु झाली ती दशमीची सायंकाळ होती. त्यांचा अवघा विषयच नारायण होता . विठ्ठलाचे रुप , प्रत्येकाची विठ्ठल भेटीची अनुभूती , विठ्ठलावर नामदेवानी ,तुकारामानी व यातील प्रत्येकानी केलेले अभंग , जिव शीव ऐक्य , श्री विष्णूंचे प्रत्येक अवतारातील कार्य , अशा अनेक विषयांवर त्यांची चर्चा चालू होती . अशातच दशमीची रात्र ,एकादशीचा दिवस व रात्र उलटून व्दादशीची माध्यान्ह झाली तर नवल कसले ? सर्वांनाच एकादशीचा निर्जल उपवास घडला होता .इकडे सगूणा मातेस चिंता पडली होती की, देवाच्या नैवद्याची व सर्व मंडळीच्या भोजनाची व्यवस्था कशी करावयाची ? कारण तुकाविप्रांचा उदर निर्वाह तर त्यांच्या भिक्षेतून चालत होता . आणि ते तर दशमीच्या सायंकाळ पासून चर्चेतच रममाण आहेत . धाडस एकवटून त्या चर्चेच्या स्थानी आल्या , काकणांचा आवाज होताच तुकाविप्रांनी प्रश्नार्थक मूद्रेने त्यांच्याकडे पाहिले व अन्तर्मनाने त्यांच्या येण्याचा हेतू जाणून म्हणाले , "आपण निश्चींत असावे बाळ नरहरी सर्व व्यवस्था करेल ,आपण फक्त त्यास साद घालावी. आज्ञा प्रमाण मानून सगुणा मातेने , पुत्रभेटीस आसावलेल्या मातेच्या प्रेमाने अगदी अंतःकरणातून "बाळ नरहरी" अशी ह्दयस्पर्शी हाक दिली . बसलेल्या मंडळीतूनच एक सहा

वर्षांचा बटू उठून उभा राहिला . त्याने प्रथम सर्व मंडळीस नमस्कार केला ,सगूणा मातेस प्रणाम करुन तो बाहेरील बाजूस चालू लागला, सगूणा माताही त्याच्या मागेमागे बाहेर गेल्या .
इकडे सर्व मंडळीस प्रश्न पडला होता की कोण हा बटू ? आत्तापर्यंत कोठे होता तो ? येथेच होता तर कोणीच कसे पाहिले नाही त्याला ? याचे उत्तर तुकाविप्र महाराज व विठोबा चातुमार्से यांच्या शांत मूद्रेत व कृतार्थ नजरेत दडले होते.
साक्षात विठ्ठलच त्यांच्या हरीचर्चेचा साक्षीदार होता. आणि प्रकट होवून त्याने सर्व सन्त मंडळींना पावन केले होते . त्यांचे अर्न्तमन शुचिर्भूत झाले होते . केवळ कर्मकांड म्हणून त्यांनी स्नानादी विधी उरकले. परत येवून पहातात तो पंचपक्वानांसहित सर्व पाकसिध्दी झालेली होती . सन्त तूकाविप्रांनी सर्वाभूती असलेल्या श्री विठ्ठलास नैवेद्य अर्पण केला . सर्व सन्त मंडळींनी भोजनाचा आस्वाद घेतला. साक्षात भगवंताच्या हातचे जेवण ते . सर्वांची आत्मक्षुधा भागली . तृप्त होवून सन्त मंडळी पुढील मुक्कामासाठी मार्गस्थ झाली .
शके १६६७ ते शके १६७८ हा बारा वर्षांचा काळात सन्त तुकाविप्र हे सगूणामाता व नरहरी समवेत ब्रम्हपूरी येथेच राहिले . तेथील एक तप पुर्ण होताच त्यांना दृष्टांत झाला पूढील साधना बोरीच्या बनात जाउन करावी .

## <u>दुसरे तप : शके १६७९ते शके १६९०</u>

ब्रम्हपूरीपासून जवळच तारगांवच्या हद्दीत कृष्णेच्या काठावरच एक बोरीचे बन होते . तेथे एक तारकोबा नावाचा धनगर आपली मेंढरे घेवून येत असे व दगडांचे टाळ करुन भजन करीत असे . खरे म्हणजे तो भगवान शंकरांचा परम भक्त होता . परंतू ब्रम्हपूरीयेथील विठ्ठल मूर्तिमध्ये सन्त तुकाविप्रांनी त्याला साक्षात शंकराचे रुप दाखवले होते तेव्हापासून तो सन्त तुकाविप्रांना फार मानत होता. सन्त तुकाविप्र बोरीच्या बनात तपश्चर्येसाठी येणार ही वार्ता तारकोबा धनगरास समजताच त्याला खूप आनंद झाला . त्याने सन्त तुकाविप्रांचे स्वागत केले व त्यांना एक बोरीचा विशाल वृक्ष दाखवला . सन्त तुकाविप्रांनी तीच जागा आपली पूढील तपोभूमी म्हणून निश्चीत केली त्यांचा येथील दिनक्रम देखील ब्रम्हपुरीप्रमाणेच होता .
त्यांच्या तपाचे एक वर्ष झाल्यावर त्यांना दृष्टांत झाला . माया विरहीत पांडुरंगाने त्याना सांगितले की या ठिकाणी मंदीर बांध . मी तेथे मूर्तिरुपाने निरंतर वास करेन . पांडूरंगाच्या आज्ञेनुसार सन्त तुकाविप्रांनी भक्त तारकोबा ,महात्मा मलीकंबर व पंचक्रोशीतील भक्तजन यांच्या सहकार्याने त्या विशाल बोरीच्या वृक्षाजवळच मंदिराची उभारणी केली . शके १६८१ च्या चैत्र शूद्ध एकादशीस सर्व मंडळींनी हरीनामाचा गजर करीत श्री विठ्ठलास आवाहन केले . श्री विठ्ठल समस्त भक्तांच्या हाकेला धावून आले . आणि कटेवर हात देवून मूर्ती स्वरुपात उभे राहीले . सर्वानी षोडशोपचारे त्यांची पुजा केली या मूर्तिखाली एक गाभारा आहे तेथे सन्त तुकविप्र ध्यानास बसत असत .

संत तुकाराम अवतारात असताना चिंचवडकरांचा गणेशोत्सव पाहून आपणही गणेशाची षोडशोपचारे पुजा करावी अशी तळमळीची इच्छा अजूनही मनात होती .समाजावरील वर्णव्यवस्थेच्या पगडयामुळे आपण ब्राम्हण झाल्याशिवाय आपणास हे शक्य नाही हे संत तुकाराम महाराज जाणून होते . तुकाविप्र अवतारात त्यांना आपल्या इच्छेचे स्मरण झाले . आपली ही गतजन्माची इच्छा पुर्ण करण्यासाठी त्षांनी श्री गणेशाची प्रार्थना केली . सिद्धीविनायकाने सन्त तुकाविप्रांस दृष्टान्त देवून सांगितले की आपली ही गतजन्माची इच्छा पुर्ण करण्यासाठी मला वाग्जाईच्या डोंगरातून घेवून यावे . दृष्टांतातील आदेशानुसार तुकाविप्र तारकोबांसह वाग्जाईच्या डोंगरात गेले . तेथे एका गुहेतून त्यांनी सिद्धीविनायकाला वाजत गाजत बोरबनात आणले व त्याची स्थापना पांडूरंगाच्या उजव्या बाजुस केली. आपल्या या इच्छेसंदर्भात संत तुकाविप्र म्हणतात

माझा नवस पुरला । देव प्रसन्न जाहला ।
आला विनायक भेटी । बद्रीवनी कृष्णातटी ।
पुर्वजन्मी इच्छा केलै । प्रस्तुत ते फळा आली ।
तुकाविप्र होणे होते । केले स्वामी सत्गुरुनाथे ।

बद्रीवनासी यावया । काय कारण तुकीया ।
पुर्व जन्मी हेत केला । तैसा तुर्त फळा आला ।
विनायकासी पुजावे । हेत केला होता जीवे ।
तुकाविप्र हेत होणे । बद्रीवनी गुरु देणे

मनीची इच्छा पुर्ण होताच संत तुकाविप्रांनी प्रसन्न अंतःकरणाने श्री गणेशाची षोडशोपचारे पुजा केली . देवभक्तीचे आपले सामर्थ्य प्रत्येक जन्मी वृद्धिंगत करणाऱ्या महान संताने केलेल्या गणपती अथर्वशिर्षाच्या लक्ष लक्ष आवर्तनाने

बोरबनचा सारा आसमंत  पावन झाला आहे  आजही सिद्धीविनायक व पांडूरंग आपल्या भक्तांसाठी बोरबन येथे नित्य वास करुन  आहेत .व भाविकही  आपल्या जन्माचे सार्थक करण्यासाठी तेथे जात आहेत

शके १६८५ च्या महाशिवरात्रीला सन्त तारकोबानी श्री विठ्ठलांसमोर संजिवनी समाधि घेतली . तुकाविप्रांनी तेथे त्यांचे स्मृती म्हणून मंदिर बांधले .  येथे  महाशिवरात्रीसाठी  जवळपासचे भाविक या महान शिवभक्ताच्या दर्शनाला येतात .

## राजघराण्यांशी संपर्क

सन्त तुकविप्रांचे बोरबनचे तप शके १६९० ला संपले . ते परत ब्रम्हपुरीस आले शके १६९१ च्या दिवाळीसाठी त्यांना तेव्हाचे सातारचे छत्रपती रामराजे भोसले व थोरले माधवराव पेशवे यांनी सातारा येथे बोलावले होते .  सातारा परीसरात  तुकाविप्रांचा मुक्काम एक आठवडा होता  . दिवसभर ते राजघराण्यातील विविध व्यक्तिंबरोबर चर्चा करत असत व रात्री गावात कीर्तन करत असत . सातारा येथे गणपतीपुढे, राजवाडयात,किल्ल्यावर किर्तने झाल्याचा उल्लेख शके १६९१ च्या अभंग गाथ्यात आहे. सन्त तुकाविप्रांच्या सातारा भेटीचा हेतू किर्तनाद्वारे जनजागृती करणे हा होता . त्यांनी आपल्या किर्तनांमार्फत सर्वांनी आपापसातील वितुष्ट विसरुन  स्वामीभक्ती, देशभक्ती यांना अग्रक्रम द्यावा असा संदेश दिला .

यावेळी सरदार बाबूराव पुरंदरे हे  सातारकर छत्रपतीच्या खास संरक्षक दलाचे प्रमुख होते . त्यांचे उतार वय झाले होते व पदरी संतान नव्हती .  तुकाविप्रांची ख्याती ते जाणून होते.  तुकाविप्रांचा अनुग्रह मिळावा म्हणून रोज रात्री ते व त्यांची पत्नी सौ गोपिकाबाई संत तुकाविप्रांच्या किर्तनास येत असत. सन्त तुकाविप्रांनी त्यांच्या मनीचे शल्य जाणले होते त्यांची भक्ती व स्वामीनिष्ठा याबाबत पण सन्त तुकाविप्रांना खात्री होती . म्हणूनच शेवटच्या रात्रीचे  कीर्तन संपल्यावर त्यांनी सरदार बाबूराव पुरंदरे यांना थांबण्यास सांगितले .  सर्व मंडळी जाताच त्यांना व सौ गोपीकाबाईंना सांगितले , “ तुमच्या मनीची इच्छा पूर्ण होईल पण आपले पहिले अपत्य आपणास आमच्या स्वाधीन करावे लागेल त्यास आम्ही  आमचा शिष्य करु” हे आशिर्वचन ऐकून पूरंदरे पती पत्नी आनंदाने गहिवरुन गेले . त्यांनी सन्त तुकाविप्रांना साष्टांग प्रणाम केला . सन्त तुकाविप्रांनी उभयंतांना  आशिर्वाद  देवून साश्रू नयनांनी व कृतार्थ भावनेने निरोप दिला .

## संकल्पपूर्ती

शके १६९२ साली फाल्गुन कृष्ण १४ आपले गुरु श्री विप्रनाथ स्वामी यांच्या व महान धर्मात्मा  संभाजीराजे भोसले यांच्याही पुण्यतिथीच्या दिवशी ब्रम्हा विष्णू महेश यांचे प्रतिक असलेल्या कृष्णा ,वेण्णा व ककुद्री या नद्यांच्या संगमावर श्री क्षेत्र माहुली (जिल्हा सातारा ) येथे सन्त तुकाविप्रांनी सन्त श्रेष्ठ नामदेव महाराज यांनी आरंभलेल्या शतकोटीच्या संकल्पाची सांगता केली . या प्रसंगाचे वर्णन करताना संत तुकाविप्र म्हणतात

तुर्त झाला शतकोटीचा शेवट । अभंग प्रगट प्रसिद्ध हा ।
हरीहर प्रिती माहुली संगम । प्रयाग निसीम जवागळा ।
पूर्ण ब्रम्हदेवी त्रिपदा गायत्री । त्रिपुर सुंदरी विठ्ठलाइ ।
प्रमाणाच्या पाडे शतकोटी वेदांत । माळा कोटी शत नामयाची ।
उगवणी झाली यथार्थ वळण  । प्रसिद्ध स्मरण विठ्ठलाइ ।
त्रिवेणी विख्यात अभंग त्रिपुटी । पुजा वाळवंटी प्रमाण हे ।
शतकोटी ग्रंथ या मागे आरती । केली हे विकृती संवत्सरी ।
प्रार्थना प्रतिष्ठान दतात्रय कृपा । कृष्ण खेळ सोपा वाळवंटी ।
ककुद्री ,वेण्या ,कृष्णा वाळवंट । ह्दय वैकुंठ विहारीचे ।
कर्म धर्म आला समय उर्जित । जाली भेटी विप्र संत मुर्ती ।
शालीवान शक सोळाशे ब्याणवी । काया नित्योत्सवी प्रगटली ।
समस्त ब्राम्हण वेदांत जाणते । वेदांताचे वक्ते गुरु वर्ण ।
एका जर्नादन सांप्रदाय माळा । त्रिमुर्ती गोपाळा भेटी येणे ।
सहपरिवारे विप्र प्रिती भावा । नमन भुदेवा शतकोटी ।
चौदावरी एका पंधरावा तुका । सोळावा तो तुकाविप्र नामा ।
ब्रम्हपुरी वास वृंदावणी कृष्ण । प्रसाद ब्राम्हण वेदांतीचा ।
अदभुत अवघा महीमा प्रगट । गुप्त हा अविट अनुभव ।
कोण जाणे काय कोणाची ते कळा । प्रमण सोहळा कृपा गुरु ।
आतुटीत वाणी वेदांत गर्जावी । कृपा नित्योत्सवी विप्र सर्व ।
अवघा आनंद जाहला प्रमाण । तुकाविप्र म्हणे गुरुकृपे ।

या महान संकल्पाचे एकूण कर्ते सोळाजण आहेत .........सन्त नामदेव महाराज व त्यांच्या कुटूंबातील तेरा व्यक्ती असे चौदा जण , ( या सर्वानी मिळून ९४ कोटी ६० लक्ष अभंग रचना केली ) सन्त तुकाराम महाराज देहूकर( यांनी ५ कोटी, ३८ लक्ष ७५ हजार अभंग रचना केली ) आणि संत तुकाविप्र महाराज (यांनी उर्वरीत १ लक्ष २५ हजार अभंग रचना केली .)

शतकोटीची पूर्तता झाल्यावर सन्त तुकाविप्र महाराज प्रतीवर्षीप्रमाणे आषाढ एकादशी साठी पंढरपूरास जाण्यास निघाले . त्याच वेळी श्री आपले तीन जन्माचे कार्य श्री विठ्ठलाच्या चरणी तत्सत श्री कृष्णार्पण करावे असा त्यांचा मनोदय होता . शके १६९३ च्या अधिक आषाढ दशमीला वाटचाल करत त्यांची दिंडी पंढरपुरजवळील वाखरी या गांवी पोहोचली . पंढरीचा राणा साक्षात पांडुरंग तेथे तुकाविप्रांच्या स्वागतासाठी सज्ज होता . आपल्या भक्तांच्या कार्य पूर्तीची पूष्पमाला परिधान करण्यासाठी तो व्याकूळ झाला होता . सन्त तुकाविप्र तेथे पोहोचताच श्री विठ्ठलांने त्यांना कडकडून अलिंगन दिले उभयतांच्या डोळयातून अश्रूधारा अखंड वाहत होत्या . हा भेटीचा अविस्मरणिय सोहळा पाहण्यासाठी स्वर्गातील देवांनीही आकाशात गर्दी केली होती . स्वतः देवेन्द्राने या दोघांवर पुष्पवृष्टी केली .या भेटीची अनुभुती मिळावी व आपलेही कार्य विठ्ठलचरणी समर्पीत होवून निष्काम मनाने पंढरीच्या राण्याचे दर्शन घडावे . म्हणून आजही आषाढ एकादशीसाठी दिंडी ,पालखी घेवून येणारे सर्व वारकरी वाखरी येथील पदचिन्हाचे दर्शन घेवून मगच पंढरपुरात प्रवेश करतात .

## जनजागृती व राजकारण

आपले कार्य विठ्ठल चरणी समर्पण केल्यानंतर संत तुकाविप्रांचा मानस काशीस जाण्याबद्दल झाला परंतू सोपानदेवांनी स्वप्नामध्ये येवून सांगितले की जनजागृतीसाठी कऱ्हा नदीची प्रदक्षिणा करावी . शके १६९३ ते शके १७०४ म्हणजेच इसवी सन १७७१ ते इसवी सन १७८२ या काळात संत तुकाविप्रांनी कऱ्हा नदीची प्रदक्षिणा केली . या काळातील राजकीय घडामोडी म्हणजे इसवी सन १७७१ मध्ये थोरले माधवराव पेशवे आजारी पडले व इसवी सन १७७२ ला २७ वर्षांच्या अल्प आयुष्यमर्यादेतच त्यांचे निधन झाले . इसवी सन १७७३ दरम्यान रघुनाथरावांनी गारद्याकडून नानासाहेब (बाळाजी बाजीराव) यांच्या तिसऱ्या मुलाचा म्हणजे नारायणरावांचा खून करविला . या सर्व घटनांमुळे खुप राजकिय अस्थैर्य आलेले होते. ही परीस्थिती सुधारण्यासाठी नारायणराावांच्या मुलास म्हणजेच धाकटे माधवराव (स्वामी) याना पेशव्याच्या गादीवर बसविणे जरुरीचे झाले होते . यासाठी इसवी सन १७७४ ला झालेल्या बाराभाइच्या कारस्थानात इतिहासात कोठेही नोंद नसली तरी तत्कालीन संत म्हणुन संत तुकाविप्रांचा सक्रिय सहभाग नाकारता येत नाही

शके १६९९ ला संत तुकाविप्र परत सातारा येथे आले . त्यांनी बाबूराव पुरंदरे यांची भेट घेतली . दरम्यान शके १६९४ मध्ये बाबूराव व गोपिकाबाईंना तुकाविप्रांच्या आशिर्वचनाप्रमाणे पहिले पुत्ररत्न प्राप्त झाले होते व त्यास वाचा नव्हती . सन्त तुकाविप्रांनी उभयंतास मागे दिलेल्या वचनाची आठवण करुन दिली. त्याग भावनेचा आनंद , पुत्रवियोगाचे दुःख अशा संमिश्र मनस्थिती मध्ये त्या दोघांनी आपल्या पाच वर्षाच्या पण मुक्या जेष्ठ पुत्रास सन्त तुकाविप्रांच्या स्वाधीन केले . सन्त तुकाविप्रांनी या बालकास पंढरपुरास आणले . विठ्ठल मंदीरातील गरुड खांबाजवळ त्याचे उपनयन करुन त्यास गायत्री मंत्राचा उपदेश दिला . योगसामर्थवान गुरुंनीच दिलेला उपदेश आणि तोही महान पावित्र्य व सामर्थ्य असलेल्या गायत्री मंत्राचा, "मुकं करोती वाचाळं" या प्रमाणे ते बालक आपल्या गुरुंच्या पाठोपाठ ॐ काराचा नाद करु लागले. हेच बालक म्हणजे सन्त तुकाविप्रांचे आवडते शिष्य व आमच्या विप्र घराण्याचे मूळ पूरुष श्री पांडुरंग उर्फ बापूसाहेब विप्र होय.

शके १७०४ ते शके १७१० म्हणजे इसवी सन १७८२ ते इसवी सन १७८८ सन्त तुकाविप्रांनी संपुर्ण महाराष्टाची यात्रा केली . याच काळात त्यांनी अभंग भागवताचे लिखाण केले .त्यांच्या भागवतातील परिक्षीत राजा म्हणजे स्वतः धाकटे माधवराव पेशवे हेच होते .

## अवतार समाप्ती

आपले अवतार कार्य आता पुर्ण झाले आहे हे जाणून सन्त तुकाविप्र हे अंजनवती (जिल्हा. बीड ) येथील आपल्या गुरुंच्या समाधीस्थळी आले . संत तुकाविप्रांचा समाधीसोहळा हा एक महान असा वाक्यज्ञच होता . कलीयुगातील तीन जन्मांमध्ये सरस्वतीच्या शुभाशिर्वादाने केलेल्या शतकोटी समिधा या यज्ञामध्ये अर्पण होणार होत्या समाधीयोगाचे वर्णन माझे माझे पूज्य पिताश्री श्री विनायक केशव विप्र ( भानुदासबुवा ) यांच्याच शब्दात देत आहे.

पौष कृप्रतिपदेला लिंबागणेश येथील भालचंद्राचे अखेरचे दर्शन घेवून प्रातःकाळी आपला ब्रम्ह वीणा व चिपळया घेवून विप्रनाथांच्या समाधीसमोर उभे राहीले . सर्वप्रथम नामदेव देहामध्ये असताना आपल्यावर या महान वाक्यज्ञाचा भार टाकणाऱ्या ज्ञानियांच्या राजास त्यांनी वंदन केले

ज्ञानराजया विष्णू दैवता । नमन तुजला ।
विनंती हे आता । एकनाथजी ज्ञानराजया।
येकची करा पुर्ण ते दया ॥
ज्ञानदेव तू येकनाथजी। विनवणी कृपा ।
करा ते आजी । तुकली तनू ती पाहीजे।
विप्र नाम या ज्ञानसंपत्ती ॥

या नंतर सतत १४ दिवस ते या महान यज्ञामध्ये शतकोटी समीधा अर्पण करीत होते . काळाला देखील स्वतःचे भान राहिले नव्हते . वाणीवरचे प्रभुत्व व आवाजाची लय यामुळे सभोवतालचा परिसर भारावून गेला होता .काय होते आहे हे कोणालाच उमजत नव्हते .

योगप्रक्रियेतील वैशिष्ठपुर्ण श्वसनक्रियेने संत तुकाविप्रांचे शरीर अंर्तअग्नीच्या प्रज्वलनाने सुवर्णासमान प्रकाशमान भासू लागले .याच वेळेस शरीरातील वायुने उर्ध्वगमनास सुरुवात केली आणि शास्त्रीय सिद्धांतानुसार वायु व अग्नी यांच्या संयोगाने शरीरातील पंचमहाभूतांचे आपापसात विघटन सुरु झाले

पृथ्वी तत्व जलतत्वामध्ये ,जलतत्व अग्नी तत्वामध्ये ,अग्नी तत्व वायु तत्वामध्ये विलीन झाले ही स्थिती पौंष कृ ११ ला आली होती . अग्नी तत्व वायु तत्वामध्ये विलीन होताच त्यांचा स्थूल देह सुटला आणि लिंग देहाने उर्ध्वगमनास सुरुवात केली .इकडे स्थुल देह सुटल्याने उर्वरीत समीधा दत्तगुरुंनी तुकाविप्र काया घेवून अर्पण करण्यास सुरुवात केली .

पुढे पौंष कृ १२ ला वायुतत्व आकाश तत्वात विलीन झाले व संत तुकाविप्रांच्या लिंग शरीराने सर्व आकाश व्यापले गेले .आकाश तत्व महत,तत्वात , महत,तत्व अहंकार तत्वात विलीन झाले तर पौंष कृ १३ च्या सायंकाळी अहंकार तत्व आदीशक्ती मायेमध्ये विलीन झाले

आणि पौष कृष्ण १४ शके १७१४ ,गुरुवार , गुरु पूष्यामृत योग, मकर संक्रांती या पावन दिनी सायंसमयी मायाशक्ती परमात्म्याच्या परा शक्ती मध्ये विलीन झाली .

एका महान संकल्पाची पुर्तता करण्यासाठी प्रथम संत नामदेवांच्या देही, नंतर संत तुकारामांच्या देही व शेवटी सन्त तुकाविप्र तनू धारण करणारी परमेश्वराच्या ह्दयीची आत्मज्योत परत परमेश्वर तेजात सामावली व कार्यसिद्धिच्या परम समाधानाने अधिकच तेजोमय होऊन मानवाला परमेश्वर भक्तीचा मार्ग दाखवू लागली . गुरुंच्या छायेत समाधीस्त होण्याचे परम भाग्य हे समग्र संत परिवारातील केवळ एकमेव अद्वितीय अशा सन्त तुकाविप्रांनाच लाभले म्हणून संत तुकाविप्र अवतारास विषेश महत्व आहे .सन्त तुकाविप्र व त्यांचे गुरु विप्रनाथ स्वामी यांची समाधी अंजनवती येथेच आहे .

## गुरुपरंपरा व सन्त तुकाविप्रांचे साहित्य

संत तुकाविप्रांचा हरीभक्तीचा वारसा श्री बापूसाहेब विप्र यांनी पूढे चालू ठेवला त्यानी ब्रम्हपुरी ,बोरबनयथील तुकाविप्रांनी स्थापलेल्या मठाप्रमाणे अंजनवती येथेही मठाची स्थापना केली त सेच श्री क्षेत्र पंढरपुर येथेही शतकोटीचे कर्ते सन्त नामदेव , सन्त तुकाराम व सन्त तुकाविप्र यांचे प्रतिक असलेल्या एकमुखी दत्तमंदीराची स्थापना केली . शतकोटीचे महत्व सांगणारी श्री बापूसाहेब विप्र यांनी सांगीतलेली गुरुपरंपरा

.............................................................................................

दत्त ............जनार्दन ...............एकनाथ .............विप्रस्वामी............ सत्गुरुनाथ.....अशी आहे यातील पहिले गुरु म्हणजे ब्रम्हा विष्णू महेश यांचे एकत्र स्वरुप असलेले साक्षात श्री गुरुदेव दत्त होय . दुसरे गुरु म्हणजे संत एकनाथ स्वामींचे गुरु जनार्दन स्वामी , तिसरे गुरु हे स्वतः संत एकनाथ महाराज पैठणकर आहेत .चौथे गुरु हे सन्त तुकाविप्रांना गर्भामध्येच अजपा गायत्रीचा उपदेश देणारे व तुकाविप्रांचे मातामह असे विप्रनाथ स्वामी होय . पाचवे गुरु सत्गुरुनाथ म्हणजे सन्त नामदेव , सन्त तुकाराम व सन्त तुकाविप्र यां तीघांच्या भक्तीचे प्रतिकअसणारे पंढरपुर येथील एकमुखी दत्त आहेत .

सन्त तुकाविप्रांचे साहित्य :

अभंग गीता (शके १६५५ )

ही गीता सन्त तुकाविप्रांनी तुकाराम या नाममुद्रेने लिहीलेली आहे . याचे सुलभ कारण म्हणजे सन्त तुकाविप्र हे जगासाठी “तुकाविप्र” असले तरी आपल्या मातेसाठी मात्र ते तुकारामच होते .

शतकोटीचे अभंग _ (शके १६६६ ते १६९२ )

अभंग गाथा (शके १६९२ ते १७०४ )

दर वर्षी सुमारे ५०० ते ७०० अभंग याप्रमाणे किमान ७००० अभंग असावेत.

अभंग भागवत (शके १७०४ ते १७१०)

अभंगात्मक तत्वमसी ग्रंथ , महावाक्य ग्रंथ , हरीपाठाचे अभंग

वरील साहित्यापैकी बरेच साहित्य काळाच्या उदरात गेले आहे .उर्वरीत साहित्य पुर्नलिखाण करुन माझे आदरणीय जेष्ठ बंधू श्री तु. ना.विप्र यानी जतन केले आहे . सर्व साहित्यास संगणकात साठवण्याचा उपक्रम लवकरच चालू करण्यात येत आहे .तसेच संत तुकाविप्रांची माहीती देणारी वेबसाइट देखील उपलब्ध करुन देण्यात येणार आहे

## वाचकांस नम्र विनंती

संत तुकाविप्र हे एकटया विप्र घराण्याचे नसून सकळ समाजाचे आहेत . सर्व संतांच्या साहित्य प्रसारास जसा समाजाने पुढाकार घेतला तसाच पुढाकार कृपया संत तुकाविप्रांच्या साहित्य प्रसारास देखील घ्यावा हीच कळकळीची विनंती आहे

संत तुकाविप्रांच्या अवतारावर लिहीण्याचा माझा हा बाळबोध प्रयत्न त्यांच्याच पसायदानाने श्री कृष्णार्पण करतो

काय मागावे नुमजे । द्यावे तुम्हा साजे
भक्ती परायण व्हावे लोक। सर्वकाळ सर्वसुख ।
शांती क्षमा दया पीक । ब्रीद मुख्य भुषण ।
सत्यवाणी नाम गर्जो । ब्रीद भुषण तुम्हा साजो ।
काम क्रोध निंदा विझो । द्वेश बुझो अहंता ॥
माझे मागणे ते किती । तुम्ही उदार चक्रवर्ती ।
ओला चातकाचा कंठ । करीता मेघा कष्ट ।
करीता चकोराचा सोहळा । न्युन नोहे चंद्रकळा ।
विप्र म्हणे नारायणा । थेंबे सिंधू नोहे उणा ॥

संपर्कः
विवेक विनायक विप्र .

vivekvipra@hotmail.com